नियमित दिवाणी दावा क्र. २०३/२०१७
बंडुपाटील बोरुडे वि. पाथर्डी नगर परिषद
निशाणी क्रमांकः १९ खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ बंडुपाटील विठोबाराजे बोरुडे यांचा पुढील सरतपास त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री.ए.के.पालवे यांच्या मार्फत–**

१. मी अभिलेखावर माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले असून त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी दाव्यासोबत फेरिस्त निशाणी–३ कडे अनुक्रमांक–२ ला दावा मिळकतीचे खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे.सदर खरेदीखत प्रमाणीत असल्याने त्यास **पी. डब्ल्यु–१ निशाणी–२५** देण्यात येते. मी दाव्यासोबत फेरिस्त निशाणी–३ कडे अनुक्रमांक–४ ला दुकानाच्या परवान्याची ऑनलाईन प्रत दाखल केली आहे. सदर ऑनलाईन प्रत असल्याने त्यास **पी. डब्ल्यु–१ निशाणी–२६** देण्यात येते. मी दाव्यासोबत फेरिस्त निशाणी–३ कडे अनुक्रमांक–अनुक्रमांक–५ ला दुकानाच्या अन्न व सुरक्षा परवान्याची ऑनलाईन प्रत दाखल केली आहे. सदर ऑनलाईन प्रत असल्याने त्यास **पी. डब्ल्यु–१ निशाणी–२७** देण्यात येते. मी दाव्यासोबत फेरिस्त निशाणी–३ कडे अनुक्रमांक–६ प्रतिवादीने दिलेली महाराष्ट नगरपरिषद अधिनियम कलम १७९ व १८१ प्रमाणेची नोटीस मुळ प्रत दाखल केली आहे. सदर प्रत मुळ असल्याने त्यास.**पी. डब्ल्यु–१ निशाणी–२८** देण्यात येते.मी दाव्यासोबत फेरिस्त निशाणी–३ कडे अनुक्रमांक–७ प्रतिवादीने दिलेली सभेची नोटीस प्रत दाखल केली आहे. सदर प्रत मुळ असल्याने त्यास.**पी. डब्ल्यु–१ निशाणी–२९** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादीतर्फे उलटतपास सुविदय विधिज्ञ श्री शिरसाठ बी.व्ही. यांचेमार्फत सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, मी पाथर्डी नगरपरिषद येथे नगरसेवक व नगराध्यक्ष म्हणुन काम केले आहे .हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुला नगरपरिषदेची

५ गुंठे मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोकळया जागेच्या पश्चिमेला रस्ता  असुन त्याच्या बाजुला बसस्थानक आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिथे रस्ता असल्याने रहदारीस अडथळा होवु नये म्हणुन नगरपरिषदेने मोकळी जागा ठेवली आहे.हे म्हणणे खरे नाही  की,मी सदर मोकळया जागेत अतिक्रमण केले आहे. हे म्हणणे खरे नाही  की,त्यामुळे नगरपरिषदेने मला नोटीस नि २८ दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
DN: c=IN, o=BOMBAY HIGH COURT, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2, cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
Date: 2026.01.09 17:44:48 +05'30'

**दिनांकः ०९/०१/२०२६.** **(शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**पाथर्डी.** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पाथर्डी.**